**नियमित दिवाणी दावा नं. १६०००२०/२०१२**
**निशान नं.१३२/ क सोबत**

**वादी तर्फे विद्वान वकील श्री. पी. एस. मानकर यांचेमार्फत उलटतपासणी सुरु**

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांचे नाव दत्तू लक्ष्मण टिपकुर्ले असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व दावा मिळकती या मुळच्या माझे आजोबा लक्ष्मण ठिपकुर्ले यांच्या मालकीच्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांना भाऊ नव्हता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, दावा मिळकत गट क्र. १४६ हा आजोबांचे मालकीचा नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, लाडवाडी येथील दावा मिळकत गट क्र. ६४ ही आजोबांच्या मालकीची होती. हे म्हणणे खरे नाही की, धामोड येथील मिळकत नं. ५२० ही आजोबांच्या मालकीची होती. हे म्हणणे खरे आहे की, धामोड येथील गट क्र. १४६ मधील घर मिळकत ही वादीची आहे. हे म्हणणे खरे आहे की, लाडवाडी हे गाव पुर्वी धामोडचाच भाग होते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत गट क्र. १४६ आणि ६४ या पुर्वी धामोड पैकी सर्व्हे क्र. ६५ आणि ९९ असे होत्या. हे म्हणणे खरे आहे की, सदरील दोन मिळकतीशिवाय माझे वडीलांची इतर कोणतीही शेत मिळकत नाही.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, माझे आईचे नाव शांताबाई असून ती माझे वडीलांची पहिली पत्नी होय. माझी आई कधी मयत झाली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांनी माझे आईचे मृत्यू पश्चात कासुबाई यांचेशी विवाह केला. हे म्हणणे खरे आहे की, माझे आईला मी व प्रतिवादी क्र. २ ते ४ अशी आपत्ये आणि कासुबाईला वादी क्र. १ असे आपत्य होय. हे म्हणणे खरे आहे की, धामोड मध्ये आमचे एकच घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सर्व प्रतिवादी, आमचे वडील दत्तू आणि वादी क्र. १ व २ हे पुर्वीपासून

एकत्र राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र. १) शिवाजी, आम्ही प्रतिवादी आणि आमचे वडील असे एकत्रीत शेती करत होतो.

**१२.** दावा मिळकत क्र. १४६ आणि घर मिळकत क्र. ५२० हे माझे वडीलांचे मालकीचे असलेबाबत माझेकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील दि.२७/०९/२००४ रोजी वारले. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांनी त्यांचे हयातीत गट क्र. १४६ मधील १ पै. हिस्सेची मिळकत केरबा बाबु पाटील आणि सिताराम ज्ञानू फडके यांना ३.५ पै. हिस्सेची मिळकत विकली. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांचे नावे १५ पै. आणि ७.५ पै. हिस्सेची मिळकत उरली.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांनी त्यांचे हयातीत कोणतेही नोंदणीकृत मृत्यूपत्र केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे वडीलांनी दि.१७/०९/२००४ रोजी मृत्यूपत्र केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वडील वारले नंतर बोगस मृत्यूपत्र तयार केले. हे म्हणणे खरे आहे की, मृत्यूपत्र हे वडीलांचे मृत्यूनंतर नोंदणीकृत केले.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, माझे तीन बहीणी पैकी कोणाचेही आडनाव गोते असे नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांना प्रकाश लक्ष्मण गोते या नावाचा नातू नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रकाश लक्ष्मण गोते यांचा आमचे परिवाराशी काहीही संबध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे वडीलांचे तथाकथीत मृत्यूपत्र हे प्रकाश गोते यांनी लिहल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे वडीलांनी दिनकर ज्ञानू कुरणे आणि शामराव भिवा पाटील यांचेसमक्ष मृत्यूपत्र लिहल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील मृत्युपुर्वी दोन वर्षे निरनिराळया आजारांनी आजारी होते. हे म्हणणे खरे

नाही की, माझे वडीलांना पॅरेलेसिस झाला होता व त्यांना चालता येत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत मृत्यूपत्रावरील अंगठा माझे वडीलांचा नाही. मला प्रकाश गोते यांचेकडून मृत्यूपत्र मिळालेनतंर मी ते नोंदणीकृत केले. हे म्हणणे खरे आहे की, मृत्यूपत्र केले पासून ते नोंदणीकृत करेपर्यंत प्रकाश गोते यांचे ताबेत होते. मृत्यूपत्र नोंदणीकृत केलेनंतर ते न्यायालयात दाखल करेपर्यंत माझे ताबेत होते. मृत्यूपत्र नोंदणीकृत करतेवेळी रजिस्टर्ड ऑफीसला मी, प्रकाश गोते आणि दिनकर कुरणे असे हजर होते. सदरील वेळी आमचेशिवाय इतर कोणीही हजर नव्हते. सदरील वेळी आमचे जबाब घेतले किंवा कसे हे मला आठवत नाही. मला सदरील वेळेचे दुय्यम निबंधक साहेब कोण होते हे आठवत नाही. सदरील वेळी साहेबांनी आम्हाला तिघांना मृत्यूपत्रातील मजकूर बरोबर असलेविषयी विचारले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही मृत्यूपत्र दुय्यम निबंधक कार्यालयात जावून कायदेशीररीत्या नोंदणीकृत केल्याचे मी खोटे सांगत आहे.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, याच कामामध्ये न्यायालयाने दि.१२/०२/२००७ रोजी माझे विरूध्द दावा मिळकत निकालापावेतो विकू नये असा तुर्तातूर्त मनाई आदेश केला. आता मला नि. १४० ते नि.१४९ वरील कागद दाखविणेत आले. हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयाचे तुर्तातुर्त मनाई आदेशानंतर केरबा लक्ष्मण बोरनाक, अभय मारुती गायकवाड, अशोक गणपती सुतार, बाजीराव कृष्णा कलिकते, महादेव भाउ फडके आणि रामदास अशोक लट्ठे यांना दावा मिळकत गट क्र. १४६ आणि ६४ मधील मिळकत थोडी थोडी करुन विकली आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरनमूद व्यक्तीची नावे खरेदीपत्रानुसार ७/१२ उता-यावर लागली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र. १ ने सदरील नोंदीविरूध्द माझे व वरनमूद व्यक्ती विरूध्द प्रांतकार्यालयात

अपीले करून सदरील नोंदी रद्द करून घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, त्या अपिलांविरूध्द आम्ही जिल्हाधिकारीसो व अप्पर आयुक्त पुणे यांचेकडे अपिले केली व ती नामंजूर झाली. हे म्हणणे खरे नाही की, केवळ आमचे राजकीय दबावामुळे रद्द झालेल्या नोंदी आजआखेर ७/१२ वर नमूद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाच्या आदेशाचा भंग केल्यामुळे मी व वर नमूद सर्व खरेदीदार हे फौजदारी कारवाईसाठी जबाबदार आहोत.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की, मी, प्रकाश गोते, दिनकर कुरणे आणि शामराव भिवा पाटील हे बोगस मृत्यूपत्र केल्याचे कारणाने देखील फौजदारी कारवाईसाठी जबाबदार आहोत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही तथाकथीत मृत्यूपत्र हे कायदयाने घालून दिलेल्या प्रकियेनुसार नोंदणीकृत केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी हजर केलेले अस्सल मृत्यूपत्रावर नोंदणीकृत केलेबाबतचा शेरा व प्रमाणपत्र नाही.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, मी मृत्यूपत्राने मालक झालेचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे कैफियतीत तसेच माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रात खोटा मजकूर नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आयकट पत्राने वादीला काही जमीन वाटून दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी माझे लाभात सर्व दावा मिळकतीचे हक्कसोड पत्र दिले आहे. मी ते हक्कसोड पत्र कामात दाखल करणेस तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, केवळ मी आणि वादी क्र. १ असेच सह हिस्सेदार दावा मिळकतीत आहोत. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र. १ ला त्याचे हिस्सेची मिळकत मिळू नये या उद्देशाने मी बोगस कागदपत्र तयार केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादीची फसवणूक करण्याचे उद्देशाने मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**वा.दा.का.दा.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

दि. १८/११/२०२५.

( एन. पी. काकडे )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
राधानगरी.